इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांना परवानगी देण्यासंदर्भात.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्र.नमाशा २००९ /(७१७/०९)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ ऑगस्ट २००९.

शासन निर्णय :-

शासन परिपत्रक, दि. २९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर जिल्हा व राज्य समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. यापैकी इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळा सुरु करण्यासंदर्भात प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा अथवा राज्य समिती, यापैकी कोणत्याही एका समितीची शिफारस आहे अशा शाळांना सन २००९-१० पासून या शाळांमध्ये सुरु असलेल्या सर्व वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय, दि. १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्यांच्याआत सुरु होणे बंधनकारक राहील, अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत असे गृहित धरले जाईल.

४. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमूद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमूद सर्व शाळांना माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार प्रथम मान्यतेकरिता संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा. सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक.
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यासन अधिकारी-प्राशि-३/उमाशि-१/माशि-२
निवड नस्ती माशि-१

सरहद ओम गुरुदत्त हौसिंग सोसायटी संचलीत सरहद स्कुल, स.नं.७९,८०,८१,७६/४ (नवीन) कात्रज पुणे,४११०४६, या शाळेस दिलेल्या परवानगीबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन शुद्धीपत्र क्रमांकः एसएफएस-१०२३/प्र.क्र.६७८/एसएम-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक: १४ सप्टेंबर, २०२३

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. व्हीएसएएस-१००२/९३६/२००२/प्रशि,दिनांक २१/१०/२००२.

२. शिक्षण संचालक, प्राथमिक यांचे पत्र क्र. जा.क्र. प्राशिसं/शाळा पत्ता दुरूस्ती/५०२/५५३३ दि. ०४ ऑगस्ट, २०२३.

शासन शुद्धीपत्र :-

संदर्भाधिन शासन निर्णयामधील "सरहद ओम गुरुदत्त हौसिंग सोसायटी संचलीत चव्हाण नगर, धनकवडी" **या ऐवजी "सरहद ओम गुरुदत्त हौसिंग सोसायटी संचलीत सरहद स्कुल, स.नं.७९,८०,८१,७६ / ४ (नवीन) कात्रज, पुणे,४११ ०४६"**असे वाचावे.

२. संदर्भाधीन शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विवेक सपकाळ)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे,
७. अध्यक्ष/सचिव, सरहद ओम गुरुदत्त हौसिंग सोसायटी, चव्हाणनगर, धनकवडी, पुणे,
८. निवडनस्ती (एसएम-२).